## रे.दि.मु.नं.२१३/२०२४ मधील निशाणी क्र.६१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.४,९ व १० यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ अन्वये तूर्तातूर्त ताकिदीसाठी दाखल केला आहे.

## वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. मिळकतीचे वर्णन–

अ) मौजे बलवडी–भा.ता.खानापूर, जि. सांगली येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे–

| अ.नं | गट नंबर | क्षेत्र<br>हे–आर | आकार<br>रु–पैसे. | हिस्सा<br>संपुर्ण |
|---|---|---|---|---|
| १) | ३०६ | ०–८५ | १–६२ | |
| २) | ३०९ | ०–९० | १–५० | ३० आर |

येणेप्रमाणे जमीन मिळकत झाडझुड, तालबंधोरा तदंगभूत वस्तुसह.

ब) दावा कलम १अ मिळकतीपैकी

| अ.नं | गट नंबर | क्षेत्र<br>हे–आर | आकार<br>रु–पैसे. | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १) | ३०६ | ०–८५ | १–६२ | यांत पश्चिम बाजूचे ४२.५० आरचे क्षेत्र |
| २) | ३०९ | ०–९० | १–५० | यांत पश्चिम बाजूचे ०–१५ आर, |

येणेप्रमाणे जमीन मिळकत झाडजुड, तालबांधोरा, तदंगभुत वस्तुसह (यापुढे वादग्रस्त मिळकत असे संबोधण्यात येईल.)

३. दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही मुळची वादी, प्रतिवादीचे पुर्वहक्कदार आनंदा पवार यांची मालकी हक्क वहिवाटीची होती. दावा कलम १ अ मध्ये व अन्य मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता आनंदाचा मुलगा प्रतिवादी नं.४ प्रभाकर यांनी आनंदाचे वारस मुले वादीचे वडील बाळासाो, मुली प्रतिवादी नं.१ ते ३, आनंदाची पत्नी यांचे विरुध्द विटे येथील मे.दिवाणी न्याया.सो क.स्तर यांचेकोर्टात रे.दि.मु.नं.१६९/२०१३ चा वाटपाबाबत दावा दाखल केलेला होता. अशा दाव्याचे कामी वादी, प्रतिवादी यांनी एक विचाराने ता. २४/०२/२०१४ रोजी आपसांत तडजोड केली होती. अशा तडजोडीत दावा मिळकती या आनंदा पवार यांच्या ताब्यात व कब्जे वहीवाटीस राहतील व अन्य कोणाचा हक्क राहणार नाही असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. त्यामुळे आनंदा पवार यांनी त्यांच्या हयातीतच दावा मिळकती १ अ मिळकतीपैकी, (दावा कलम १ ब ही मिळकत) पश्चिमेकडील आठ आणे हिस्सा वादी, प्रतिवादी नं.५ ते ८ यांना वाटून दिल्या व दावा मिळकती १ अ मिळकतीपैकी पुर्वेकडील आठ आणे हिस्सा प्रतिवादी नं.४ यांना वाटून दिल्या त्याप्रमाणे दावा कलम १ ब या मिळकतीत वादीची कब्जे वहीवाट होती व आहे. त्यास अनुसरुन वादी हे दावा कलम १ ब या मिळकतीची मेहनत मशागत करुन उत्पन्न घेत आलेले होते.

४. वादीनी सदरचा दावा दाखल केलेली माहिती व जाणिव प्रतिवादी नं.१ ते ४ यांना झालेली होती. सदर दावेचे कामी वादीनी दावा कलम १ मधील मिळकतीबाबत प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी कोणतेही तबदिलीचे व्यवहार करु नये म्हणुन दिलेले ताकीद अर्जावर मे.कोर्टाने कारणे दाखवा नोटीसीचा हुकूम केलेला आहे. मात्र प्रतिवादी यांनी दावा मिळकतीबाबतचे घाई गडबड करून दि.३१/०७/२०२४ रोजी बेकायदेशिररित्या प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी प्रतिवादी नं.४ यांचेशी गट नं. ३०९ बाबतचा खरेदी दस्त तसेच प्रतिवादी नं.१ते ३ यांनी प्रतिवादी नं. ९ व १० यांचेशी गट नं. ३०६ या मिळकतीचा तबदिलीचा व्यवहार,

खरेदीदस्त केलेचे वादीस समजुन आले आहे. प्रतिवादी नं. ४, ९ व १० यांना दावा कलम १ मधील ग.नं. ३०६,३०९ या मिळकतीचा कब्जा मिळालेला नव्हता व नाही. तसेच प्रतिवादी नं.१ यांनी दावा कलम १ मधील मिळकतीचा केलेला लेख वादीचे हिताचे विरुध्द आहे. प्रतिवादी नं.१ यांना ग.नं.३०६,३०९ या मिळकतीत वादीचा असणारा हिस्सा वादीचे अपरोक्ष विक्री करणेचा कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही. प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी प्रतिवादी नं.४,९ व १० यांचेशी केलेला व्यवहार हा वादीचे अपरोक्ष असलेने दावा मिळकतीतील हक्कावर व हिश्यावर बंधनकारक नव्हता व नाही. तसेच सदर दाव्यातील प्रतिवादी नं. ४,९ व १० हे कागदोपत्री खरेदीदार असलेने त्यांनी सुट फॉर जनरल पार्टीशन करुन घेतले शिवाय दावा मिळकतीत समाईकांत कब्जे वहीवाट करता येत नव्हती व वादीस दावा कलम १ ब या मिळकतीतुन हुसकावुन कब्जा करता येत नव्हता व नाही.

५. वादी हा एकाकी असुन वादीस मनुष्यबळ नसलेने त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नं. ४,९,१० यांच्याकडे मनुष्याचे व पैशाचे मोठे पाठबळ असुन गावातील राजकीय लोकांचा वरदहस्त आहे. त्याच्या जोरावर प्रतिवादी नं.४,९,१० हे दांडगाव्याने दावा कलम १ ब या मिळकतीत कब्जा केलेशिवाय व वादीस हुसकावुन लावले शिवाय राहणार नाहीत, मग मात्र वादीस दावा मिळकतीतील असणारे पिकास व उत्पन्नास मुकावे लागणार असुन त्यामुळे वादीचेच कधीही पैशाने न भरुन येणारे कायमस्वरुपी नुकसान होणार आहे. तरी सदरहू दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो वादीचे दावा कलम १ ब मध्ये नमुद केलेले मिळकतीतील शांततामय कब्जे वहीवाटीस प्रतिवादी नं.४, ९ व १० यांनी स्वत. हस्तक, नोकर, एजंट, नातेवाईक, संबंधितामार्फत हरकत अथवा अडथळा करुन दावा कलम १ ब या मिळकतीतुन हुसकावुन कब्जा करु नये अगर तिऱ्हाईत इसमांचे कोणतेही हक्क निर्माण करु नये म्हणुन दरम्यानची तुर्तातुर्त ताकीद देवेविणेत यावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

<u>**प्रतिवादी क्र.९ व १० तर्फे नि.क्र.७८ वर वादीचे तूर्तातूर्त ताकीद अर्जास दिलेले म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे**</u>-

६. वादीचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज व शपथपत्र व त्यातील संपूर्ण मजकूर साफ खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादींना मान्य नाही. दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही मुळची वादी, प्रतिवादीचे पुर्वहकक्कदार कै. आनंदा पवार यांची मालकी हक्क वहिवाटीची होती. दावा कलम १ अ मध्ये व अन्य मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता प्रतिवादी नं.४ प्रभाकर यांनी विटे येथील मे. दिवाणी न्याया.सो क.स्तर यांचे कोर्टात रे.दि.मु.नं. १६९/२०१३ चा दावा दाखल केलेला होता. अशा दाव्याचे कामी वादी यांनी एक विचाराने ता.२४/०२/२०१४ रोजी तडजोड केली होती व आहे.

७. सदर तडजोडीत दावा मिळकती या आनंदा पवार यांचे वाटपास देऊन त्या यांच्या ताब्यात व वहीवाटीस राहतील व अन्य राहणार नाही. असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. सदर तडजोडी नुसार दावा मिळकती या आनंदा बापू पवार यांचे नावे नोंद राहिलेल्या होत्या. सदरची मिळकत हि सरस निरस मानाने वाटप व स्वतंत्र मालकी हक्काची होवून त्यानुसार आनंदा बापू पवार यांचे नावे झाली होती. अशी परीस्थिती असताना दरम्यान आंनदा बापू पवार यांचे निधन दिनांक २२/११/२०१४ रोजी झाले नंतर त्यांचे पश्चात दावा कलम १ अ मध्ये नमुद केलेले मिळकतीस आनंदाची मुले बाळासो, प्रभाकर व प्रतिवादी नं.१ ते ३ यांची फे.नं ७१९१ ने वारस नोंद नुसार प्रतिवादी नं.१ ते ३ यांना वारस म्हणून पुन्हा सदर दावा मिळकतीत हक्क प्राप्त झाले होते व आहेत व तेव्हा पासून त्या त्यांचे कब्जे वहिवाटला आहेत.

८. कै. आनंदा बापू पवार हे रीतसर वाटप होऊन मिळालेल्या मिळकतीस मालक सदरी असणाऱ्या नोंदीचे आधारे त्यांनी आपल्या हयातीत गट नं. ३०६ मधील संपूर्ण क्षेत्र मृत्यूपत्राने आपले नातू प्रवीण प्रभाकर पवार व प्रमोद पवार यांना दिलेली आहे. त्याचे बाबत वादीने मुद्दाम खोडसाळ पणाने तक्रार

दिलेने त्या बाबत मे. सागली येथील दिवाणी न्यायाधीश सो वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात दि.दी. कि अर्ज नं. ४० /२०१५ दावा प्रोबेट करिता दाखल करावा लागला असून तो दावा आता मे. विटा येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कडे सुरु असून त्याचा नवीन नंबर दि.कि.अर्ज नं १४/२०२० असा आहे. सदर दाव्यात वादी हा तिऱ्हाईत इसम म्हणून दाखल झाले आहेत, ही बाब मे. कोर्टपासून लपवलेली आहे.

९. प्रतिवादी नं. १ ते ३ यांची फे. नं.७१९१ ने वारस नोंद झाली त्या आधारे सात बारा सदरी त्यांची नावे दाखल झालेली होती व आहेत. तेव्हा पासून त्या त्यांचे कब्जे वहिवाटीस होत्या व आहेत. त्याबाबत वादीने आजतागायत कोणतीही तक्रार केली नव्हती व नाही. मौजे बलवडी (भा), ता. खानापूर , जि. सांगली येथील जमीन गट नं. ३०६, क्षेत्र ० हे. ८५ आर, पो.ख. 0 हे.0 आर, या मिळकतीतील प्रतिवादी नं.१ ते ४ यांचा समाईकातील असणारा सदरचा संपूर्ण हिस्सा त्यांचे कायदेशीर गरजेकरिता विक्रीस काढला असता प्रतिवादी नं. ४ यांचे मुले प्रतिवादी नं. ९ व १० प्रवीण प्रभाकर पवार व प्रमोद प्रभाकर पवार यांना सदरची मिळकत दि.३०/७/२०२४ रोजी र.द.अ.नं. ३१२१/२०२४ या नोंदणीकृत खुशखरेदीपत्राने चतुःसिमापुर्वक खरेदी व ताबा दिलेला होता व आहे. सदरील खुशखरेदीपत्रानुसार फे.नं.९७४१ हा मंजूर करणेत येवून मौजे बलवडी (भा) येथील गट नं.३०६ यास खरेदीदार प्रवीण प्रभाकर पवार व प्रमोद प्रभाकर पवार (प्रतिवादी नं.९ व १०) यांचे नावाची नोंद दिनांक १८/१०/२०२४ रोजी झाली आहे. सदर मिळकती मध्ये प्रतिवादी नं. ९ व १० यांची शांततामय कब्जे वहिवाट होती व आहे.

१०. मौजे बलवडी (भा) ता.खानापूर जि.सांगली येथील जमीन गट नं. ३०९ क्षेत्र हे. ९० आर पो.ख. ० हे. ० आर. या मिळकतीतील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना समाईकातील असणारा सदरचा संपूर्ण हिस्सा विक्रीस काढला असता प्रतिवादी नं. ४ यांनी सदरची मिळकत दि.३१/७/२०२४ रोजी

र.द.अ.नं.३१२२/२०२४ या नोंदणीकृत खुशखरेदीपत्राने चतुःसिमापुर्वक खरेदी व ताबा दिलेला होता व आहे. सदर खुशखरेदीपत्रानुसार फे.नं ९७४२ हा मंजूर करणेत येवून मौजे बलवडी (भा) येथील गट नं. ३०९ यास खरेदीदार (प्रतिवादी नं. ४) प्रभाकर पवार यांचे नावाची नोंद दिनांक १८/१०/२०२४ रोजी झाली आहे.

११. वादी यांनी खोडसाळपणे वरील दोन्ही नोंदी प्रकरणी तक्रार अर्ज दाखल केलेला होता. त्याबाबत रीतसर तक्रार चालून सदरचे नोंदी बाबत निर्णय झाला आहे. सदरचा तक्रार अर्ज चालू असताना याबाबत संपूर्ण माहिती असताना केवळ प्रतिवादी यांना त्रास देणेचे हेतूने सदरचा दावा हा नंतर दाखल केलेला आहे. वादीने नि.५ ला दिलेला दरम्यानचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज व वादीचा प्रस्तुत चा दावा यामधील मजकूर हा बहुतांशी एकसारखा (स्टेरिओ टाइप) असल्याने तो सदरील प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही.

१२. दावा मिळकतीत रे.दि. मु. नं. १६९/२०१३ नुसार रीतसर वाटप होऊन आलेली मिळकत वाटपानुसार स्वतंत्र कब्जेवहिवाट असलेने वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरील दावा दाखल करून प्रतिवादी यांचे विरुद्ध ताकीद मागता येणार नाही. सदरील प्रतिवादी यांनी कर्ज काढून व नातेवाईक यांचे कडून हात उसने पैसे घेऊन सदर मिळकतीचे खरेदीपत्र केलेले आहे. प्रतिवादी यांचे फार मोठे नुकसान होणार आहे तर वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादी नं. ९ व १० यांना सदरील वाद मिळकती बाबत वाद मिळकतीचे पूर्व हक्कदार व प्रतिवादी नं. ९ व १० चे आजोबा कै. आनंदा बापू पवार यांनी दिनांक १७/१०/२०१४ रोजी मृत्यूपत्र करून दिलेले होते व आहे. सदरील वाद मिळकत हि कै. आनंदा बापू पवार यांना वादी व प्रतिवादी यांचे मध्ये झालेले रे.दि.मु.नं १६९ /२०१३ नुसार रीतसर वाटप होऊन आलेली मिळकत असून त्यानुसार वाद मिळकतीचे पूर्वहक्कदार कै.आनंदा बापू पवार सदरील मिळकतीचे मालक (absulut owner) झालेले होते.

१३. सदरील मिळकतीचे पूर्व हक्कदार कै.आनंदा बापू पवार हे दिनांक ११/१२/२०१४ रोजी वार्धक्याने आपले घरी बलवडी (भाळवणी) येथे मयत झाले. कै. आनंदा बापू पवार यांना रे.दि.मु.नं १६९/२०१३ नुसार रीतसर वाटप होऊन आलेली मिळकत बाबत त्यांनी दिनांक १७/१०/२०१४ रोजी प्रतिवादी नं. ९ व १० यांना मृत्यूपत्र करून दिलेले होते व आहे. सदरील मृत्यूपत्राबाबत प्रोबेटसाठी विटा येथील मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे किरकोळ अर्ज नं. १४/२०२० प्रलंबित असून सदरील दाव्यात देखील वादी त्रयस्त इसम म्हणून हजर होऊन म्हणणे दिले आहे. सदरील वाद मिळकतीबाबत प्रतिवादी यांचे मध्ये आपापसात तडजोड झालेली असून त्यानुसार प्रतिवादी नं. ९ व १० यांना व प्रतिवादी नं. ४ यांना सदरील वाद मिळकतीची विक्री झालेली आहे.

१४. सदरील वाद मिळकतीचे पूर्वहक्कदार कै.आनंदा बापू पवार हे मयत झाल्यानंतर वारस नोंदी नुसार प्रतिवादी नं. ९ व १० यांनी प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे कडून त्यानी योग्य व कायदेशीर गरजेकरिता मिळकत विक्रीस काढली असता दि.३१/७/२०२४ रोजी र.द.अ.नं. ३१२१/२०२४ ने नोंदणीकृत खरेदीपत्राने चतु:सीमापूर्वक सदरील मिळकत खरेदी घेतलेली होती व आहे. सदरील मिळकतीचा कब्जा त्यांनी त्याच वेळी प्रतिवादी नं. ९ व १० यांना दिला असून त्या प्रतिवादी नं. ९ व १० यांचे कब्जे वहिवाटीस आज रोजी आहेत. वादी मे. कोर्टासमोर चुकीची वस्तुस्थिती व मिळकतबाबत आकडेवारी आणत असून मे.कोर्टाची दिशाभूल करीत आहे.

१५. प्रतिवादी यांना मिळकतीचे पूर्वहक्कदार कै.आनंदा बापू पवार यांनी करून दिलेल्या मृत्यूपत्राबाबत निर्णय घेण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. तसेच त्यांचे मृत्यूनंतर झालेल्या वारस नोंदी वरून देखील सदरील मिळकतीचेबाबत खरेदीपत्र करून प्रतिवादी (वारस) व प्रतिवादी नं.९ व १० यांनी आपापसात तडजोड करून सदरील मिळकती बाबत असणारा वाद मिटवला असून विनाकारण वादी सदरील मिळकतीबाबत वाद निर्माण करून प्रतिवादी यांना

खर्चात पाडत आहे.

१६. वादी हे मे. कोर्टात चुकीची माहिती देऊन दाव्यास कोणतेही कारण घडले नसताना प्रतिवादी यांना मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या हेतूने स्वार्थी भावनेने त्यांना दावा मिळकतीतील हक्क अधिकारापासून वंचित ठेवण्याच्या हेतूने खोटा दावा व ताकीद अर्ज दाखल करून त्रास देत असल्याने वादीचा दावा व ताकीद अर्ज रद्द करण्यात यावा. प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादीच्या बाजूने दाव्याचा कल आहे. सदर कामी प्रतिवादी यांना प्रायमाफेसी केस असून वादी यांना कोणतीही केस नाही. तरी वादी यांचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

१७. वादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती.एस.एच.जाधव व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.एम.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिपक्षाच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह पुढील प्रमाणे देत आहे;

| **क्र.** | **मुद्दे** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी त्यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने झुकत आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | तूर्तातूर्त ताकीद आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

## वादी यांचेतर्फे फे.नि.क्र.३,४५,४९ अन्वये दाखल केलेले दस्तऐवज

१. मौजे बलवडी भा. येथील गट क्र.३०६, ३०९ च्या दि.३०.०७.२०२४ रोजीच्या ७/१२ उताऱ्यांच्या मुळ प्रती.

२. मौजे बलवडी भा. येथील फे.क्र.७१९१ च्या दि.१५.११.२०१८ रोजीची छायांकित प्रत.

३. विटा येथील रे.दि.मु.क्र.१७६/२०१७ मधील प्रतिवादी क्र.१ ते ३ ची कैफियतची व नि.क्र.१ ची प्रमाणित प्रत.

४. दि.३१.०७.२०२४ रोजीचे गट क्र.३०६ व ३०९ चे मुळ खरेदी दस्त.

५. विटा येथील कि.दि.अ.क्र.१४/२०२० मधील नि.क्र.१ ची नक्कल.

६. उपविभागीय अधिकारी विटा यांचेकडील आर.टी.एस अपील २८१/२०२४ व २८२/२०२४ मधील आदेशाच्या छायांकित प्रती.

७. नि.क्र.८९ अन्वये वादीतर्फे साक्षीदार सुमन होलमुखे यांचे शपथपत्र.

## प्रतिवादी क्र. १ ते ४ व ९ यांचेतर्फे फे.नि.क्र.४१ व ८३ अन्वये दाखल केलेले दस्तऐवज

१. प्रतिवादी क्र.९ व १० यांचे कब्जेतील गट क्र.३०६ खरेदी मिळकतीमधील शेतीचे ऊसपिकाचे फोटो.

२. दिवाणी वाद क्र.१६९/२०१३ मधील नि.क्र.५३ वादी व प्रतिवादी यांचेतील तडजोड हुकूमनामाची मुळ प्रत.

३. मा.तलाठी यांचेकडील वादी यांच्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत.

४. मंडल अधिकारी भाळवणी यांचे न्यायालयातील तक्रार

रजि.क्र.२१/२०२४ आणि रजि.क्र.२२/२०२४ च्या निकालाच्या मुळ प्रती.

**मुद्दा क्रमांक ०१ करिता:–**

१८. सर्व प्रथम हे नमूद करणे गरजेचे आहे की, तात्पुरत्या मनाई हुकुमाची दाद ही संपूर्णपणे न्यायसंगत आणि न्यायालयाचे विवेकावर आधारीत दाद आहे. सदरची दाद ही न्यायलयाने मंजूर करीत असताना न्याय, समानता (equity) आणि विवेक या तत्वांचा वापर करणे अपेक्षित आहे. सदरची दाद ही न्यायालयाचे न्यायिक विवेकावर आधारलेली असल्यामुळे अर्जदाराने हे प्रथम दर्शनी हे दाखविणे गरजेचे आहे की, त्याचा वाद जमीनीवर अधिकार आणि हितसंबंध आहे. त्याचबरोबर गैरअर्जदारचे कर्तव्य आहे की, त्याने अर्जदाराचे अधिकार आणि हितसंबंधांना बाधा पोहचवू नये. याव्यतिरीक्त अर्जदारने समानतेच्या तत्वाअन्वये (equity) दाद मागण्यासाठी न्यायालय समक्ष स्वच्छ हाताने समोर यायला पाहिजे.

१९. सदरहू अर्ज हा तूर्तातूर्त ताकिदीचा असलेमुळे केसचा गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे नाही. तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस व सोयीचा समतोल कोणाचे बाजूने आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल इतकी मर्यादित बाब विचारात घेणे जरुरीचे आहे.

२०. वादीचे असे कथन आहे की, त्यांचे आजोबा नामे आनंदा बापू पवार यांच्या मालकी व वहिवाटीची वादमिळकत होती. त्यांचा मृत्यू दि.११.१२.२०१४ रोजी झालेला आहे. आनंदाचा मुलगा प्रतिवादी क्र.४ प्रभाकर याने आनंदाची मुले म्हणजे वादीचे वडील बाळासो, मुली प्रतिवादी क्र.१ ते ३ सुमन, शोभा, राजश्री आणि आनंदाची पत्नी अनुसया यांच्याविरुध्द दिवाणी न्यायालय, क.स्तर विटा येथे नियमित दिवाणी मुकदमा क्र.१६९/२०१३ हा वाटपाचा दावा दाखल

केलेला होता. सदरील दाव्यात वादी प्रभाकर व प्रतिवादी यांच्यात तडजोड झालेली होती.

२१. अभिलेखावरील वादीने दाखल केलेल्या दि.दा.क्र.१६९/२०१३ यातील दि.२५.०३.२०१४ रोजीच्या तडजोड हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता त्यात असे नमूद केले आहे की, या प्रकरणातील वाद मालमत्ता गट क्र.३०६ व ३०९ या आनंदा बापू पवार यांच्या ताब्यात व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटी राहतील. तसेच वादी व प्रतिवादी यांची आई अनुसया आनंदा पवार प्रतिवादी क्र.१ ते ३ सुमन, शोभा व राजश्री या वादी व प्रतिवादी यांच्या बहिणी यांनी दावा मिळकतीतील आपले सर्व हक्क राजीखुषीने विचारांती कोणतीही तक्रार न करता पूर्णपणे सोडून दिलेले असल्याचे दिसते. सदरचा न्यायालयीन हुकूमनामा हा दि.२५.०३.२०१४ रोजीचा आहे. त्यानंतर दि.२२.११.२०१४ रोजी आनंदा यांचे निधन झाले,आनंदा यांच्या निधनानंतर पुन्हा वाद मालमत्तेवर वारस नोंदी झाल्या आणि सदरील नोंदींमुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ व वादी यांच्या नावाची नोंद झालेली आहे.

२२. वादीचे असे कथन आहे की, आनंदा पवार यांनी त्यांच्या हयातीत दावा मिळकत १ अ मिळकतीपैकी(दावा कलम १ ब ही मिळकत) पश्चिमेकडील ८ आणे हिस्सा वादी, प्रतिवादी क्र.५ ते ८ (विजय वादीचा भाऊ, विदया आणि हेमा वादीच्या बहिणी) यांना वाटून दिला व दावा मिळकतीतील १ अ पूर्वेकडील ८ आणे हिस्सा प्रतिवादी क्र.४ प्रभाकर (काका) यांना वाटून दिला. सदरील कथनाच्या अनुषंगाने मयत आनंदा यांनी वाद मालमत्तेचे वाटप वादी व प्रतिवादी यांना कधी करुन दिले या बाबी नमूद केलेल्या नाहीत. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा, दाव्याची कारणे दाखवा नोटीस प्रतिवादी यांना गेल्यानंतर घाईगडबडीने दि.३१.०७.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.४ यांच्याशी गट क्र.३०९ बाबतचा खरेदी दस्त केला. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.९ व १० यांच्याशी गट क्र.३०६ या

मिळकतीचा तबदिलीचा व्यवहार करुन खरेदीदस्त केले. या कथनाच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा हा दि.२२.०८.२०२४ रोजी दाखल केल्याचे दिसते व प्रतिवादी क्र.१ ते ४ आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ आणि प्रतिवादी क्र.९ व १० यांच्यातील खुषखरेदीपत्राचा व्यवहार हा दि.३०.०७.२०२४ रोजी व दि.३१.०७.२०२४ रोजी केल्याचे दिसून येते म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ४ आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ व ९ ते १० यांच्यातील व्यवहार हा प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापूर्वीच झालेला होता. अभिलेखावरील वादी यांनी दाखल केलेल्या ७/१२ या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, गट क्र.३०६ चे एकूण क्षेत्र हे ०.७५ गुंठे एवढे आहे तर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी ०.६८ गुंठे एवढे क्षेत्र प्रतिवादी क्र.९ व १० ला खुषखरेदीपत्रानुसार तबदिल केल्याचे दिसून येते. तसेच गट क्र.३०९ चे एकूण क्षेत्र हे ०.३० गुंठे एवढे क्षेत्र असल्याचे तर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.४ ला ०.१८ गुंठे एवढे क्षेत्र खुषखरेदीपत्रानुसार तबदिल केल्याचे दिसून येते.

२३. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ सुमन हिने वादीतर्फे अभिलेखावर नि.क्र.८९ अन्वये शपथपत्र दाखल करुन प्रतिवादी क्र.४,९ व १० यांनी दावा मिळकतीचे पोकळ खरेदीपत्र केले असून त्याचा कोणताच मोबदला प्रतिवादी क्र.४,९ व १० यांनी त्यांना दिलेला नसल्याचे कथन करते. सदरच्या कथनाला अनुसरुन अभिलेखावरील खरेदीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, खुषखरेदीखत करतेवेळी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना वादजमीन विक्री करुन त्यांना योग्य मोबदला देवून खरेदीखत केल्याचे दिसते. त्यामुळे सदरचा वादीचा साक्षीदार सुमन यांनी जरी वादीला पुष्टीवर्धक कथन केले तरी त्यांचे कथन हे विश्वासार्ह वाटत नाही व शंका निर्माण होते.

२४. वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र.४, ९ व १० हे वादग्रस्त मिळकतीमध्ये अडथळा करुन हुसकावून लावण्याची दाट शक्यता आहे. प्रतिवादी यांनी वादीस कोणत्या तारखेला कोणामार्फत कधी हुसकावून लावले तसेच

वादीचे पिकांचे उत्पन्नाचे किती नुकसान झाले याबाबी वादीने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या नाहीत. वादीच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी हे वादग्रस्त वादमिळकतीचे मालक हिस्सेदार आहेत व प्रतिवादी क्र.१ ते ३ ने प्रतिवादी क्र.४ यास व प्रतिवादी क्र.१ ते ४ ने प्रतिवादी क्र.९ व १० यास वाद मालमत्ता तबदिल केली आहे. त्यामुळे वाद मालमत्तेचे तिऱ्हाईत इसमाचे हक्क निर्माण करु नये अशी ताकीद दयावी अशी विनंती केली आहे परंतू जर दावा शेती सार्वजनिक एकत्र कुटुंबाची असेल तर प्रतिवादींना पाबंद करता येणार नाही. यदाकदाचित जर प्रतिवादींनी भविष्यात दावा शेती वडीलोपार्जित असून विक्री केली किंवा कुठल्याही प्रकारे हस्तांतरण केले तर सदरचे हस्तांतरण हे बेकायदेशीर होईल व ते वादीवर आपोआपच बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे या अर्जाच्या विचाराअंती मी या मतास आले आहे की, वादी हे त्यांची केस सकृतदर्शनी सिध्द करु शकले नाहीत. समतोल वादीच्या बाजूने नाही. त्यामुळे मी वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता–</u>**

२५. वादीने त्याची केस सकृतदर्शनी असल्याचे, न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने असल्याचे व हा अर्ज नामंजूर झालातर त्याचे न भरुन येणारे नुकसान होईल या बाबी सिध्द केलेल्या नाहीत. म्हणून दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादीचे दावा कलम १ ब मध्ये नमुद केलेले मिळकतीतील शांततामय कब्जे वहीवाटीस प्रतिवादी नं.४, ९ व १० यांनी स्वत. हस्तक, नोकर, एजंट, नातेवाईक, संबंधितामार्फत हरकत अथवा अडथळा करुन दावा कलम १ ब या मिळकतीतुन हुसकावुन कब्जा करु नये अगर तिऱ्हाईत इसमांचे कोणतेही हक्क निर्माण करु नये म्हणुन दरम्यानची तुर्तातुर्त ताकीद असा आदेश मिळण्यास वादी पात्र नाही. सदरचे वरील चर्चा ही या अर्जापुरतीच मर्यादीत राहिल त्याचा पुढील खटल्यात कारवाईमध्ये कुठलाही परिणाम होणार नाही. करीता मुद्दा क्रं ४ उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. वादी यांचा निशाणी क्र.६१ वरील तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.07.18 18:17:24 +0530

विटा. (श्रीमती. व्ही.डी.शिरसे)
दिनांक १८.०७.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,विटा.
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

Name of Stenographer :- G.U.Varude
Name of the Court :- Smt. V.D.Shirse
Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.
Vita. Tal:-Khanapur.
Date of decision :- 18.07.2026
Order signed by P.O. on :- 18.07.2026
Order uploaded on :- 18.07.2026